# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक २८/०१/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

**चोरी**

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील भाटीया बंद कोल वारीचा मागे इंदर डंपिग जवळ येथे दि. २८.०१.२२ चे २१.३० ते २२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— ओमप्रकाश रामचंद पाल वय ३४ वर्ष, न्यु टेकाडी कॉलनी, क्वॉटर नं. ११६ ब्लॉक नं. २४ गोडेगाव कन्हान व गार्ड साक्षीदार हे गोंडेगाव ओपन कास्ट येथे पेट्रोलिंगची डयुटी करीत असतांना यातील आरोपी क्र. १. समिर रफिक खान वय ३४ वर्ष, रा. रोस कॉलनी गंगानगर नागपुर व २. मिथुन मनि नडार वय ३० रा मनसर हे गोंडेगाव ओपन कास्ट खदान येथील वेकोली डंपिगचा अंदाजे १५ टन दगडी कोळसा ३,०००/—रू. चा प्रति टन ४५,०००/—रू. चा माल चोरून आपल्या ताब्यातील १४ चाकी एम.एच.—४०/सीडी.—५०४० क्रमांकाच्या ट्रक मध्ये भरून विकण्यासाठी घेउन जात असतांना मिळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री शेख मो.क्र. ९४०३६९२७६६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील वाकोडी डोहनघाट शिवार येथे दि. २७/०१/२०२२ चे १३.०० ते १३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— आरिफ बशिर वाघाडे, वय ३६ वर्ष, रा. वाकोडी ता. सावनेर हा आपला कापुस विकुन कापसाचे ७०,०००/—रू. जॉकेटच्या खिश्यात ठेवुन जॉकेट घालुन शेतात गेला होता. तो शेतात काम करिता असतांना त्याने आपले अंगातील जॉकेट अंगातुन काढून शेतातील खऱ्यावर ठेवुन काम करित असतांना मजुराकडे गेला काही वेळाने जॉकेट ठेवलेल्या ठिकाणी पाहीले असता जॉकेट दिसुन न आल्याने, त्याने आजुबाजुला शेतात पाहीले असता जॉकेट बाजुच्या शेतात नालीमध्ये मिळुन आले. परंतू जॉकेटच्या खिश्यात ठेवलेले नगदी ७०,०००/—रू. दिसुन न आल्याने व कोणीतरी अज्ञात आरोपीने जॉकेट मधील नगदी ७०,०००/—रू. चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मुकुंदा लोंदे मो.नं.९३७०३२१६९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**